# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ४०/२०१८**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्रमांक संकिर्ण २०१७/प्र.क्र.२०८/१७/सहा, दिनांक १७/११/२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये, माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० दिवसांपर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधित पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन त्यासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर शासन परिपत्रकाची माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्याचंकडील पृष्ठांकन क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२४/२०१७/आस्था-२, दिनांक १७/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक यासोबत जोडण्यात आले आहे. तरी सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रकान्वये दिलेले निर्देश विचारात घेऊन संबंधितानी त्यानुसार कार्यवाही करावी.

AS 1|3|18

**(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**
**जा.क्र. - मा.अ./२०१८/४१६**
**दिनांक - ५/३ /२०१८.**

**सोबत :-** वरीलप्रमाणे शासन परिपत्रक.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
३) सर्व प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा आढावा घेऊन त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७ /प्र.क्र.(२०८/१७) सहा.
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक- १७.११.२०१७.

परिपत्रक:-

माहिती अधिकारात अर्जदाराला वेळेवर माहिती मिळण्यासाठी, जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास जलदगती टपालाने टपालखर्चासह तपशीलवार कळविण्याबाबत एक परिपत्रक निर्गमित करण्याचे निर्देश व्दितीय अपील क्र.केआर ५०४१/२०१६ मध्ये दि.९.८.२०१७ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दिले आहेत आणि अन्य व्दितीय अपील क्र.केआर ५१८४/२०१६ मध्ये १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम जलदगती टपालाने अर्जदारास टपालखर्चासह कळविण्यासह शासन कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी आवश्यक आर्थिक तरतूद तीन महिन्यात करण्याचे निर्देश मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दि.११.८.२०१७ रोजी दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सुचित करीत आहे.

२. “जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी. तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी ”.

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

४ सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१११७११३२२९३००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chhaya Kiran Wadte

Digitally signed by Chhaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f311bd8712a7b94b3b73d0e88ad01cf3a49c098bcd5f62e16e7135388baa523c, serialNumber=5bac345149360802f8cd3e4ab4ec174f2fec1bff420e81931e638ee6cdfcc12d, cn=Chhaya Kiran Wadte
Date: 2017.11.17 11:34:55 +05'30'

**(छा.कि.वडते)**

**शासनाच्या उप सचिव.**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव.
३. सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
६. *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. *प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
९. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०.*प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११.मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१३.सर्व मंत्रालयीन विभाग
१४.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी
१५.महासंचालक, यशदा, पुणे
१६.निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्यासन सहा. **<u>*पत्राने</u>**